# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.02.2025** **वार- बुधवार**

---

**शिवनेरी**

छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित किल्ल्यांचं जतन आणि संवर्धनाचं काम राज्य शासनाच्या वतीनं सातत्यानं सुरु असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज शिवनेरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सव सोहोळ्याप्रसंगी बोलताना केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

शिवाजी महाराजांचे राज्यातील 12 गड किल्ले जागतिक वारसास्थळाचा दर्जा मिळण्यासाठी नामांकनाकरिता निवडले असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. प्रारंभी शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला. राष्ट्रगीत तसंच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकानं वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकानं बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धतीनं सादर केले.

**पदयात्रा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात 'जय शिवाजी, जय भारत' पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार जीवनामध्ये स्वीकारण्याचा संकल्प युवकांनी करावा असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी बोलताना केलं. तर विकसित भारताचा संकल्प घेण्यासाठी 'जय शिवाजी, जय भारत' पदयात्रा असल्याचं केंद्रीय मंत्री मनसुख मांडविय यावेळी बोलताना म्हणाले. पदयात्रेचा शुभारंभ कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग पुणेच्या वसतिगृह मैदानापासून झाला आणि फर्ग्युसन महाविद्यालयात तिचा समारोप झाला.. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा प्रबोधिनी, महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येनं या पदयात्रेत सहभाग घेतला.

**शिवसृष्टी**

पुण्यात उभारल्या जात असलेल्या शिवसृष्टीच्या द्वितीय टप्प्याचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आलं. महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीनं आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या मूळ संकल्पनेतून साकारत असलेली शिवसृष्टी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचं एक केंद्र ठरणार असून, शिवसृष्टीच्या तिसऱ्या टप्प्याच्या उभारणीसाठी 50 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी घोषणा त्यांनी याप्रसंगी केली.

**स्वराज्यरथ**

पुण्याच्या शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीनं लालमहाल इथून भव्यदिव्य मिरवणुक आज काढण्यात आली. या सोहोळ्याचं उदघाटन खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री

मुरलीधर मोहोळ आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. 51 रणरागिणींच्या शौर्य पथकानं मर्दानी युद्ध कला यावेळी सादर केली. एकंदर 96 स्वराज्य रथांसोबत ढोलताशा पथकांचं वादन, सनई-चौघडयांचे मंगलमय सूर, पारंपरिक पोशाखातील महिला आणि शिवभक्त या मिरवणुकीची वैशिष्ट्यं ठरली.

**<u>शिवजयंती</u>**

पुण्यातील कोढवा इथं मुस्लिम मावळा फाउंडेशनच्या वतीनं सर्वधर्मीय शिवजयंती सोहोळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये मुस्लिम समाजातील युवक ,महिला आणि शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<u>संमेलन रेल्वे</u>**

पुण्यातील सरहद संस्थेद्वारे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या दिल्ली इथं होत असलेल्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्तानं पुणे ते दिल्ली विशेष रेल्वे प्रवासादरम्यान ‘मराठी साहित्ययात्री संमेलन’ आयोजित करण्यात आलं आहे. या विशेष रेल्वेला महान सेनानी महादजी शिंदे यांचं नाव देण्यात आलं आहे तर रेल्वे डब्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड-किल्ल्यांची नावं देण्यात आली आहेत. ‘गर्जा महाराष्ट्र माझा’ या महाराष्ट्र गीताच्या सामूहिक गायनानंतर पुण्यातून ही रेल्वे दिल्लीसाठी रवाना झाली. तत्पूर्वी पुस्तक दिंडीही काढण्यात आली. ढोल-ताशा पथक, मृदुंग, टाळवादक यांचा यात सहभाग होता. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष, मराठी भाषामंत्री उदय सामंत आहेत. महाराष्ट्रातील विविध गावांमधून साहित्यिक, युवक, लोककलाकार, समाज माध्यमातील प्रभावी व्यक्तिमत्व तसंच शाहिरी आणि भजनी मंडळं या रेल्वे संमेलनात सहभागी झाली आहेत.

**<u>मेट्रो</u>**

हडपसर ते लोणीकाळभोर आणि हडपसर ते सासवड रेल्वेस्थानक या दोन उन्नत मेट्रो मार्गांना पुणे महापालिकेच्या मुख्य सभेनं मान्यता दिली आहे. यासाठी 5 हजार 704 कोटी रुपये खर्च येणार आहे. हडपसर ते लोणी काळभोर हा मार्ग साडेअकरा किलोमीटरचा असणार आहे. या मार्गावर 10 स्थानकं असतील. हडपसर ते सासवड रेल्वेस्थानक हा मार्ग साडेपंचवीस किलोमिटरचा असेल. या मार्गावर पाच स्थानकं असतील.

**<u>जीबीएस</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत आत्तापर्यंत जीबीएस आजाराचे 32 रुग्ण आढळले असून यापैकी 23 रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. एक रुग्ण दगावला असून तीन रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत.

**<u>कृषी</u>**

राज्यातील चार कृषी विद्यापीठांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीची सामायिक प्रवेश परीक्षा 23 ते 25 मे या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळानं प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**